


साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013

■ वर्ष : १३ वे ■ अंक : ५० वा ■ सोमवार दि. ०६ जूलै ते १२ जूलै २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४



खासगी आणि अशांत:... पान २ वर | नाविण्यपुर्ण उपक्रमाव्दारे... पान ३ वर | पंढरपूरात मंचर ग्रामस्थ... पान ४ वर


## समपातळीवर चेंबर नसणे, चेंबरवरील जाळ्या साफ नसणे, मग पावसात तळ्याचे स्वरूप अन् वाहतूककोंडीत पुणेकरांचा जातोय जीव ?






चेंबर खचल्याने टेम्पोचा मागील चाक अडकल्याने टेम्पोचा रस्त्यावर वाहतूकीला अडथळा होताना दिसत आहे

**पुणे** : निकृष्ठ काम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची आणि संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी तातडीने सुरू करावी असे श्रीनाथ भिमाले, स्थायी समिती अध्यक्ष यांनी काही दिवसापूर्वीच पत्रकार परिषदेमध्ये सांगितले होते. यावर कोणकोणत्या ठेकेदार आणि अधिकारी यांच्यावर कारवाई होते. याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे. कारण पुणे महानगरपालिकेतील १५ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे यासाठी एकूण ६० कोटीची तरतूद केली असतानाही आणि प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय ४-४ कोटीची कामे काढली असतानाही पुणेकरांना पावसाळी पाण्याचा त्रास हा सहनच करावा लागतो मग प्रश्न पडतो की, ६० कोटीचे झाले काय?

महापालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले, पावसाळी लाइन, चेंबर्स, ड्रेनेज लाइन आणि कल्व्हर्ट्सची सफाई ३१ मेपर्यंत केली जाते. मात्र, दरवर्षी ही कामे करण्यासाठी विशेषत: जमिनीखालील कामे (पावसाळी लाइन व ड्रेनेज लाइन) करण्यासाठी ठेकेदार ३०, ४० टक्के कमी दराने निविदा भरतात, आणि त्या मंजूरही होतात. कामे झाल्यानंतर त्या कामाची बिले निघतात. मात्र, लहान लहान पावसामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरते, रस्त्यावर पाणी साचते. यामुळे पावसाळी कामे होण्यावर संशय व्यक्त केला जातो. काम न करताच नगरसेवक, अधिकारी व ठेकेदार हे संगनमताने बिले काढतात, अशी टीका दरवर्षी होत असते. या पार्श्वभूमीवर ड्रेनेज सफाईच्या कामांची रोबोटच्या माध्यमातून तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि हे काम शुक्रवारी दि.५ जून रोजी सुरू झाल्याची माहिती पालिका अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिली होती. यामध्ये एका चेंबरपासून दुसऱ्या चेंबरपर्यंत ड्रेनेज लाइनची तपासणी करण्यात आली. पण नालेसफाईच्या कामाबाबत प्रशासनाने केलेला दावा फोल ठरल्याने स्थायी समितीमध्ये याचे चांगलेच पडसाद उमटले. (पान ३ वर)

## नगररोड, येरवडा, ढोलेपाटील क्षेत्रीय अधिकारी आणि उपायुक्त श्री.माधव जगताप यांच्यावर केव्हा गुन्हा दाखल होणार



शासकीय गेस्ट हाऊस आणि वाडिया कॉलेज समोरील उड्डाणपुल येथे पावसाच्या पाण्यामुळे तळ्याचे स्वरूप आले आणि वाहतूक कोंडी वाढतच गेली

**पुणे** : विविध सेवा वाहिन्यांसाठी रस्त्यावर खोदाई करून कामानंतर योग्य प्रकारे रस्ते दुरूस्ती केली नाही. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असल्याचा ठपका ठेवत वाहतूक पोलिसांनी स्वत:हून महापालिकेचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीच्या एका अभियंत्यावर व एका सुपरवायझरवर गुन्हा दाखल केला आहे.

महापालिकेकडून शहरात विविध रस्त्यांवर सेवा वाहिन्या टाकण्यासाठी शासकीय, निमशासकीय व खासगी संस्थांना सशुल्क परवानगी दिली जाते. पथ विभागाकडून १ ऑक्टोंबर ते ३१ एप्रिलपर्यंत खोदाईला परवानगी दिली जाते. त्यानंतर खोदाई बंद करून ३१ मेपर्यंत रस्ते दुरूस्त करणे बंधनकारक असते. महापालिकेकडूनही ड्रेनेज लाईन किंवा जलवाहिन्यांसाठी ठेकेदार कंपन्यांमार्फत खोदाई केली जाते. खोदाईनंतर तातडीने रस्ते दुरूस्त करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदार कंपनीवर असते. मात्र, अनेकवेळा ठेकेदार खोदाईचे काम संपल्यानंतर योग्य पध्दतीने रस्ते पूर्ववत करत नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात शहरात वाहतूक कोंडी होते.

यंदाही महापालिका आयुक्तांनी खोदाई थांबवून पावसाळ्यापूर्वी रस्ते योग्यप्रकारे दुरूस्त करण्याचे आदेश दिले होते. यंदा पावसाळा एक महिना उशीरा सुरू झाला तरीही खोदकाम केलेले रस्ते अद्यापही दुरूस्त झालेले नाहीत. त्यामुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीस जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मोहिम आता वाहतूक पोलिसांनी हाती धेतली आहे. उंड्री येथील होले वस्ती चौकात खोदाई करण्यात आली आहे. खोदाईनंतर ६ मेपासून खोदाई केलेल्या ठिकाणी डांबरीकरण करण्यात आलेले नाही. रस्ते योग्यप्रकारे दुरूस्त न केल्याने या ठिकाणी आता रोज वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे पोलिस स्वत:हून पुढकार घेत आहेत. याच धर्तीवर नगररोड, येरवडा, ढोलेपाटील क्षेत्रीय अधिकारी आणि उपायुक्त श्री.माधव जगताप यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. कारण येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका, जावक क्र.४६९६, दिनांक ०९/१०/२०२३ च्या कार्यालयीन परिपत्रक काढून मा.उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र.१ पुणे महानगरपालिका यांचे पत्र जा.क्र.५२२६ दि.०६/१०/२०२३ ठराव क्र.४/४२७ दि.०४/१०/२०२३ च्या अनुषंगाने मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/४५३ दि.०८/९/२०२२ चे निविदा कार्यप्रणाली प्रपत्रनियम ४(९)(२)(४)(१) नुसार ठेकेदार मे.सचिन कन्स्ट्रक्शन यांनी performance Security Deposit भरणा विहित मुदतीत केला नसल्याने तसेच मनपाचा वेळ वाया घालविल्याने १ वर्ष मुदतीसाठी मे.सचिन कन्स्ट्रक्शन यांना पुणे महानगरपालिकेची कोणतीही निविदा भरण्यास बंदी घालण्यात येत आहे. तसेच संबंधित ठेकेदाराची बयाणा रक्कम जप्त करणेत येत आहे. याचप्रमाणे श्री.जे.बी.चव्हाण यांच्यावर कारवाई करण्याऐवजी श्री.माधव जगताप यांनी या ठेकेदारास वाचविण्याचा प्रयत्न केल्याचा दिसत आहे. यासाठी उपायुक्त परिमंडळ कार्यालय क्र.१ पुणे महानगरपालिका जावक क्र.ई-१६६०९/५४९८, दि.२०/११/२०२५ रोजी पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त(ज) यांच्याकडे ठेकेदार जे.बी.चव्हाण यांनी अतिरिक्त performance Security Deposit रक्कम (एफडीआर) मुदतीत दाखल न केलेबाबत सादर केलेले होते. तरीही येरवडा क्षेत्रीय अधिकारी आणि उपायुक्त श्री.माधव जगताप यांनीच जे.बी.चव्हाण या ठेकेदारांना वाचविण्यासाठीच दिशाभूल करणारेच पत्रव्यवहार केला. त्यावर काय झाले याची माहिती देण्यात येत नाही. पण जे.बी.चव्हाण आणि त्यांचे वडील श्री.बी.एन.चव्हाण यांनाच एकामेकाचे स्पर्धक दाखवून चुकीच्या पध्दतीने इतर ठेकेदारांना अपात्र करण्यात आले आहे. आणि सध्याची परिस्थिती पाहता संबंधित क्षेत्रीय अधिकारी, ठेकेदार आणि उपायुक्त श्री.माधव जगताप यांच्यावर गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे?







पहिल्याच पावसाने लोहगाव आणि परिसरातील पायाभूत सुविधांची दैना उडवली आहे. लोहगाव-वडगाव शिंदे रस्ता सध्या पूर्णपणे मृत्यूचा सापळा बनला असून, येथे रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता अशी भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे.

# संपादकीय...

## खासगी आणि अशंत: अनुदानित शिक्षण संस्थाची भरती अखेर मार्गी

खासगी अनुदानित आणि अशंत: अनुदानित शिक्षण संस्थाच्या व्यवस्थापनातील वादामुळे शिक्षक भरती रखडली होती. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची गंभीर दखल घेत राज्य शासनाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. धर्मादाय आयुक्तांकडे एखाद्या संस्थेचा व्यवस्थापन वाद वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असल्यास, त्या शाळांमधील शिक्षक भरती आता थांबणार नाही. अशा प्रकरणांमध्ये शिक्षण विभाग थेट पुढाकार घेऊन पवित्र पोर्टलव्दारे शिक्षक भरती पूर्ण करणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने बुधवारी (दि.१) रोजी जारी केला. या निर्णयाचे शिक्षक संघटनांनी स्वागत केले आहे. नुकतेच नीट पेपरफुटीचे प्रकरण ताजे असतानाच महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेची (महाटीईटी) प्रश्नपत्रिकाही फुटल्याचा प्रकार समोर आला

रविवारी २८ जून होणारी राज्यातील शिक्षक पात्रता (टीईटी) प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे शासन निर्णय येईपर्यंत स्थगित ठेवण्यात आली

या पेपरफुटीमुळे राज्यभरातील ६,००,१२५ परीक्षार्थींच्या मेहनतीवर पाणी फेरले परिक्षा देणाऱ्यामध्ये कार्यरत शिक्षक २,२६,००० होते. तर नोकरी हवी असणारे २,०२,००० विद्यार्थी होते. राज्याच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित टीईटीच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय पातळीवरील नीट आणि यूपीएससी परीक्षेच्या धर्तीवर अत्यंत कडक नियमावली लागू करण्यात आली होती. मात्र, प्रत्येक प्रश्नपत्रिकेवर लावलेला विशेष क्यूआर कोड आणि इतर सुरक्षा उपाय असतानाही प्रश्नपत्रिका फुटलीच कशी? असा प्रश्न परीक्षेला सामोऱ्या जाणाऱ्या राज्यातील उमेदवारांनी उपस्थित केला होता.

सरकार शिक्षण परिषदेने शिक्षकांच्या जीवाशी खेळ केला आहे. शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी राजीनामा दिलाच पाहिजे यासह अनेक प्रकारच्या संतप्त प्रतिक्रिया शिक्षकांनी दिल्या आहेत. टीईटीची परीक्षा रद्द होताच सोशल मीडियावर शिक्षकांच्या भावनांचा उद्रेक बघायला मिळाला. पण या निर्णयामुळे राज्य मुख्याध्यापक महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महासंघ, महानरगरपालिका यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, संबंधित शिक्षणाधिकारी किंवा विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मुख्याध्यापक अथवा प्रभारी मुख्याध्यापक यांच्या मदतीने शिक्षक संवर्गाची बिंदूनामावली अद्यायावत करून ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासून घ्यावी लागेल. त्यानंतर संचमान्यता, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि रिक्त पदांची पडताळणी पूर्ण झाल्यावर रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत पवित्र पोर्टवर भरतीची जाहिरात प्रसिध्द केली जाईल.

या भरती प्रक्रियेत मुलाखत घेतली जाणार नाही. पवित्र पोर्टवरील गुणवत्तेनुसार १:१ प्रमाणात उमेदवाराची शिफारस करण्यात येईल आणि शिफारस झालेल्या उमेदवाराला कोणत्याही परिस्थितीत नियुक्ती नाकारता येणार नाही. नियुक्ती आदेश देण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक किंवा प्रभारी मुख्याध्यापक यांच्याकडे असेल. शासनाने स्पष्ट केले आहे की, शिक्षक भरीतीव्यतीरिक्त शाळा किंवा संस्थेच्या इतर कोणत्याही प्रशासकीय बाबींमध्ये शिक्षण विभाग हस्तक्षेप करणार नाही. मात्र, मुख्याध्यापकांनी भरती प्रक्रियेत सहकार्य करण्यास नकार दिल्यास त्यांचे वेतन रोखणे किंवा शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. एखादी संस्था एका जिल्ह्यात, अनेक जिल्ह्यांत किंवा एकापेक्षा अधिक शैक्षणिक विभागांत शाळा चालवत असल्यास, त्या-त्या स्तरावरील शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक किंवा शिक्षण संचालक यांच्या माध्यमातून ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित अबाधित ठेवणे आणि शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे शिक्षणावर होणारा परिणाम टाळणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. याशिवाय, व्यवस्थापनाच्या वादातील कोणत्याही पक्षाला शिक्षक भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करता येणार नाही. भरती प्रक्रियेत अडथळा निर्माण केल्याचे आढळल्यास संबंधित शाळेवर प्रशासक नेमण्याची कारवाई करण्याचाही दशारा शासनाने दिला आहे.

साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**

Email : sangharshachaaawaz22@gmail.com

Email : sangharshachaaawaz@rediffmail.com

Mob. : 7276871008 / 9665487134



**मागील अंकावरून**

नाही कारण तो तिाा तो योग्यप्रकारे उदरनिर्वाह करू शकत नाही.

ड) हे तरूण गृहस्था, हे सहा दुष्परिणाम आळसी लोकामध्ये असतात, तो कोणतेही काम करित नाही. तो काम न करण्याची अशी कारणे देतो.

१) आज खूप थंडी आहे.

२) आज अत्यंत उष्णता आहे.

३) आज रात्र झालीय, खूप उशिर झाला आहे.

४) सूर्य उक्षवायला बराच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

५) मला आता बरीच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

६) अधिक जेवल्यामुळे थोडी वामकुक्षी घ्यावी.

अशा प्रकारे अनेक कारणे सांगून तो कोणतेही काम करित नाही. नविन धन मिळवित नाही. अशामुळे जी धूसंपत्ती आहे ती तो हळू हळू घालवून बसतो.

भगवान बुध्दांनी हे सांगितल्यावर ते पुन्हा म्हणाले कांही खाण्यापिण्याचे दोस्त असतात जो पर्यंत तुझ्याकडून कांही तरी मिळते तोपर्यंतच तुला तुझ्यासमोर मित्र म्हणतील; ते सर्व लाभार्थी आहेत.

सूर्योदयापर्यंत झोपणे, पती अुवा पत्नीचा विश्वासघात करणे, रागीट स्वभाव, दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास **क्रमश:**

# सिगोलवाद सुत्त

**मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.**

**जयभीम!**

**उत्तमराव सोनवणे**



# नाविण्यपूर्ण उपक्रमांद्वारे जादूटोणा विरोधी कायद्याची प्रचार, प्रसिद्धी करा - विभागीय आयुक्त शीतल तेली

**पुणे** : जादूटोणा अंतर्गत गुन्ह्यांची संख्या कमी होत आहे, ही सकारात्मक बाब आहे. जुन्या चालीरिती, रुढी-परंपरा बदलण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाविण्यपूर्ण उपक्रमांद्वारे राबवून प्रचार, प्रसिद्धी करावी, अशा सूचना विभागीय आयुक्त शीतल तेली- उगले यांनी दिल्या.




जादूटोणा विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी गठीत विभागीय समितीच्या आढावा बैठकीत श्रीमती तेली बोलत होत्या. यावेळी समितीच्या सदस्य सचिव तथा समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, पुणे जिल्ह्याचे सहायक आयुक्त विशाल लोंढे तसेच विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

श्रीमती तेली म्हणाल्या, या कायद्याची विविध स्पर्धांमधून जनजागृती करता येईल. विद्यार्थी हे संदेशवहनाचे काम चांगल्या प्रकारे करु शकतात, त्यामुळे शाळांमध्ये विशेषत: आदिवासी भागातील शाळांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करावेत. विविध भागांमधील गुन्ह्यांची मिमांसा करुन सेवाभावी संस्था, बिगर शासकीय संस्थांना सामील करुन घ्यावे. नियमानुसार जिल्हास्तरीय समित्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात यावे. या कायद्याशी संबंधित सर्व घटकांनी एकत्रितरित्या काम केल्यास कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होऊ शकेल. सर्व जिल्ह्यांनी प्राप्त निधीचा खर्च प्रचार-प्रसिद्धीच्या कामासाठी करावा, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत या कायद्यांतर्गत दाखल प्रकरणे, उपलब्ध अनुदान, गुन्हयांची संख्या आदी विषयांचा विभागीय आढावा घेण्यात आला.

# समपातळीवर चेंबर नसणे, चेंबरवरील जाळ्या साफ नसणे,...

(पान १ वरून) या समितीमध्ये प्रशासनावर गंभीर ताशेरे ओढण्यात आले. प्रशासनाने पावसाळी गटारे ९२ टक्के स्वच्छ झाल्याचा दावा केला होता. मात्र प्रत्यक्ष तपासणीत सुमारे ५० टक्के गटाऱ्यांमध्ये माती, दगड, गाळ आणि कचरा आढळून आला, नागकिंच्या कराच्या पैशातून कोट्यवधी रूपये खर्च होऊनही प्रत्यक्ष कामे दर्जाहीन झाली आहेत, कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून ठेकेदारांना देयके देण्यात आली का, याची चौकशी होणे आवश्यक आहे, प्रशासनाकडे प्रभावी देखरेख आणि गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा नसल्याचे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे, प्रत्येक वर्षी नालेसफाईवर मोठा खर्च केला जातो, मात्र पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचणे आणि पूरस्थिती निर्माण होणे हे अपयशाचे द्योतक आहे, कामाची तपासणी नागरिकांच्या तक्रारीनंतर होत असेल तर प्रशासनाची यंत्रणा अपयशी ठरल्याचे मानावे लागेल, फक्त ठेकेदारांवर कारवाई करून चालणार नाही, तर संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करावी. असे ताशेरे ओढून स्थायी समितीने अनेक प्रश्न उपस्थित करत म्हणाले की, नालेसफाईची एकूण कामे किती टक्के पूर्ण झाली आहेत?, प्रत्यक्ष तपासणीसाठी कोणती स्वतंत्र यंत्रणा कार्यरत होती?, किती किलोमीटर नाले व गटारे साफ करण्यात आली?, किती ठेकेदारांना कामे देण्यात आली आणि त्यांची यादी काय?, निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर यापूर्वी काय कारवाई झाली?, कोणत्या अधिकाऱ्यांनी काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिले?, कामाचे देयक किती अदा करण्यात आले आहे?, सीसीटीव्ही, ड्रोन किंवा जीपीएस आधारित मॉनिटरिंगचा वापर झाला का?, पूरप्रवण भागांसाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला आहे का?, पुढील दहा दिवसांत उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी काय कृती आराखडा आहे?, सुचविण्यात येणाऱ्या प्रभावी उपाययोजना तात्काळ उपाय, शहरातील सर्व प्रमुख नाले आणि पावसाळी गटाऱ्यांचे विशेष ऑडिट करावे, प्रत्येक कामाची व्हिडिओग्राफी आणि जिओ-टॅगिंग अनिवार्य करावी, देयके देण्यापूर्वी तृतीय पक्षाकडून (Third party Audit) तपासणी करावी, पूरप्रवण भागा (24x7) आपत्कालीन पथके तैनात करावीत. तसेच दीर्घकालीन उपायासाठी स्मार्ट ड्रेनेज मॉनिटरिंग सिस्टम विकसित करावी, नालेसफाईचे संपूर्ण काम ऑनलाइन डॅशबोर्डवर नागरिकांसाठी खुले करावे, पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण (social Audit) करावे, स्थायी समिती अध्यक्ष म्हणून प्रशासनाला श्रीनाथ भिमाले यांनी सूचना केल्या की, ७ दिवसांत सर्व कामांचा सविस्तर अहवाल सादर करावा, निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरू करावी, प्रत्येक प्रभागनिहाय नालेसफाईचा प्रगती अहवाल स्थायी समितीसमोर सादर करणे बंधनकारक करावे, पावसाळा संपल्यानंतर नालेसफाईच्या कामाचे श्वेतपत्र (White Paper) प्रसिध्द करावे. असे स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले. तर दुसरीकडे कालच रविवारी दुपारी झालेल्या पावसाने वाघोली, लोहगांव, येरवडा, पुणे स्टेशन, ढोलीपाटील येथील ताडीवाला रोड, कोथरूड, शिवणे, उत्तमनगर, कापेरे आणि कोंढवे-धावडे परिसरात पाण्याचे तळेच्या तळे साचले होते. याने पुणेकर नागरिकांना मोठी कसरत करून त्या-त्या परिसरातून जावे लागले. प्रशासनाने आणि सत्ताधारी पक्षाने यातून बोध घ्यावा. आणि करोडो रूपयांची कामे लावलेली असताना अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर त्या-त्या संबंधित ठेकेदाराला नक्कीच काळ्या यादीत टाकण्यासाठी त्वरित प्रक्रिया चालू करावी. आणि संबंधित अभियंते, अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी चालू करून ताबडतोब कारवाई करावी. जेणेकरून यापुढील कारभार पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त राहील. याची दक्षता सत्ताधारी पक्षाने आणि प्रशासन प्रमुखाने घ्यावी एवढीच विनंती.

# विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत घरभेटींची जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडून पाहणी



**पुणे** : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत बूथस्तरीय अधिकारी सध्या घरोघरी जाऊन मतदारांना प्रगणना नमुना अर्ज वितरित करून आवश्यक माहिती संकलित करत आहेत. या घरभेटी मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज शिवाजीनगर, हडपसर आणि पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्र परिसरांना भेट दिली.

यावेळी त्यांनी बीएलओंकडून सुरू असलेल्या घरभेटींच्या कामकाजाची माहिती घेतली तसेच मतदारांना प्रगणना फॉर्मचे वितरण, माहिती संकलन आणि पडताळणीची प्रक्रिया तपासली. नागरिकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी कोणताही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना बीएलओंना दिल्या.

जिल्हाधिकारी डुडी यांनी मतदार यादीतील माहिती अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह करण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. नागरिकांनी बीएलओंना आवश्यक कागदपत्रे व अचूक माहिती वेळेत उपलब्ध करून देत या लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

**निवेदन**

आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे. करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!

संपर्क : ७२७६८७१००८, ९६६५४८७१३४

**सा.संघर्षाचा आवाज तेरावा वर्धापण विशेषांक**

संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे गौतम बुध्द, छत्रपती शिवराय, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आण्णाभाऊ साठे या चळवळीशी सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकी जपत लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाशी इमान राखत आणि प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधत आतापर्यंतचा प्रवास केला आहे. बहुजन समाजाचे मुखपत्र म्हणून सा.संघर्षाचा आवाजास २६ जुलैला १३ वर्षे पुर्ण होत आहे. तर सा.संघर्षाचा आवाज २७ जुलै २०२६ रोजी चौदाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने 'सा. संघर्षाचा आवाज तेरावा वर्धापण विशेषांक' २७ जुलै २०२६ ला प्रकाशित करणार आहोत. या वर्धापण दिनानिमित्त विशेषांकाचे कामकाज चालू आहे. तरी वाचक, हितचिंतक, देणगीदार, जाहिरातदार व मान्यवरांनी आपली व आपल्या फर्म, व्यवसाय, संघटना आदींची जाहिरात देऊन सहकार्य करावे. सा.संघर्षाचा आवाजास नेहमी करीत असलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आपले सदैव आभारी आहोत.

जाहिरातीसाठी संपर्क :- ७२७६८७१००८, ९६६५४८७१३४

# पंढरपुरात मंचर ग्रामस्थ वारकरी सेवा मंडळाच्या भव्य भक्तनिवासाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते लोकार्पण

**पंढरपूर** : पंढरपूर येथे मंचर ग्रामस्थ वारकरी सेवा मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या धर्मशाळा-भक्तनिवासाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन व लोकार्पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीपराव वळसे पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, ह.भ.प. कानोबा महाराज मोरे, यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**वारकऱ्यांच्या सेवेसाठी हक्काचे घर**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होते. आजचा दिवस मंचर आणि आंबेगाव तालुक्यातील हजारो ग्रामस्थ-भाविकांसाठी आनंदाचा व भाग्याचा आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्यच.



जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे आपुले, तोचि साधू ओळखावा या तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत त्या म्हणाल्या, ऊन-पावसाची पर्वा न करता पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व वारकरी मंडळांनी ही वास्तू उभारली हे कौतुकास्पद आहे.

**मंचरची ऐतिहासिक परंपरा व वास्तूची उपयुक्तता**

मंचरला पांडवकालीन बारव, तपेश्वर भूमीची आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. संत तुकाराम महाराजांनी 'मंचरी' हा हस्तलिखित ग्रंथ मंचर येथे लिहिला, त्यात ५३७ अभंग आहेत. ही मंचरकरांसाठी अभिमानाची बाब आहे, असे पवार यांनी नमूद केले.

वारीमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला हक्काचा निवारा मिळावा यासाठी ही सुसज्ज धर्मशाळा उपयोगी ठरेल. ही इमारत भक्ती व सेवेचे केंद्र बनेल. मंडळाचे संस्थापक ह.भ.प. मारुती धोंडेबा मोर्डे ऊर्फ अण्णा गुरुजींनी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण झाले आहे. 'पूर्ण केला मनोरथ' या उक्तीप्रमाणे आंबेगाव-मंचरच्या ग्रामस्थांचे पंढरपुरात हक्काचे घर झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

**दानशूरांचे ऋण व पंढरपूर विकास आराखडा**

गोवर्धन समुदायाचे देवेंद्र शहा यांच्यासह अनेक दानशूरांनी प्रकल्पासाठी मोठी मदत केली, त्यांचे ऋण उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले.

दादांना पंढरपूर जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ बनवायचे होते. पालखी महामार्ग हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांची अनेक स्वप्ने पूर्ण झाली, उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्या म्हणाल्या.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्याला राज्यस्तरीय शिखर समितीने मान्यता दिली आहे. सुमारे ४,००० कोटींच्या या आराखड्यातून पुरातन मंदिर-मठांचे जतन, भव्य कॉरिडॉर, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा घाट सुशोभीकरण, आधुनिक वाहनतळ, व्यापारी संकुल, रस्ते, पूल व पालखी तळांचा विकास होणार आहे.

**वारीसाठी सुविधा**

१२ जूनला पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात १० दिंडी प्रमुख व मंदिर समिती अध्यक्षांची बैठक घेऊन सुरक्षित सुविधा देण्याचे निर्देश दिले. दिवेघाट-हडपसर व बारामती-इंदापूर मार्गाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण होईल. वारीसाठी एसटी महामंडळाच्या साडेपाच हजार बसची व्यवस्था करण्यात आली आहे.

मी तेर या संत गोरा कुंभारांच्या गावची आहे. दर एकादशीला आमच्याकडेही वारी, पालखी, भजन-कीर्तन असते. लहानपणापासून माऊलींशी वेगळे नाते आहे. दादांचे शब्द खरे करून दाखवणे ही माझी जबाबदारी आहे, असे सांगत, एलनीनोच्या संकटातून महाराष्ट्राला मुक्त करण्याची प्रार्थना त्यांनी विठुरायाचरणी केली.

कार्यक्रमास पंढरपूर व मंचर नगरपालिकेचे नगरसेवक, सेवा मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, उपाध्यक्ष सुभाष थोरात, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, शासकीय अधिकारी, पत्रकार व हजारो वारकरी उपस्थित होते.

---

## पुण्यात वंचित बहुजन युवा आघाडीने स्वखर्चाने लावला 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले उद्यान'चा नामफलक; महापालिकेच्या दिरंगाईचा निषेध




**पुणे** : पुणे स्टेशन परिसरातील जय जवान नगर, ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालया शेजारील उद्यानाचा अधिकृत नामफलक बदलण्यात प्रशासनाने दिरंगाई केल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन युवा आघाडीने स्वखर्चाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले उद्यान असा नवीन नामफलक लावला.

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १३ मधील या उद्यानाचे उद्घाटन सन १९९१ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या वतीने साध्वी सावित्रीबाई फुले उद्यान या नावाने करण्यात आले होते. मात्र, भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, स्त्रीशिक्षणाच्या जनक, स्त्रीमुक्तीच्या अग्रदूत आणि सामाजिक क्रांतीच्या महानायिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना केवळ साध्वी या उपाधीत मर्यादित करणे हा त्यांच्या कार्याचा अवमान असल्याची भूमिका वंचित बहुजन आघाडीने घेतली होती. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीने सातत्याने पाठपुरावा, निवेदने आणि आंदोलने केली. त्यानंतर पुणे महानगरपालिकेकडे नाव दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. अखेर ३ मार्च २०२६ रोजी महापालिकेच्या नाव समितीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले उद्यान हे नाव अधिकृतपणे मंजूर केले.

मात्र, ठराव मंजूर होऊन अनेक महिने उलटूनही ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय प्रशासनाने अधिकृत नामफलक बदलण्याची कार्यवाही केली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने वंचित बहुजन युवा आघाडीने निषेध नोंदवत स्वखर्चाने नवीन नामफलक उभारला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, हा केवळ नामफलक नसून महापुरुष आणि महामातांच्या सन्मानासाठी दिलेल्या संघर्षाचा विजय आहे. सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाच्या लढ्यात अशा प्रश्नांवर यापुढेही ठाम भूमिका घेतली जाईल.

या प्रसंगी किशोर रिकिबे (अध्यक्ष, वंचित बहुजन युवा आघाडी, पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा), युवा नेते मयुर गायकवाड, आकाश कासले (उपाध्यक्ष), अमर सावंत (महासचिव), शिवा डावरे (पुणे शहर सचिव), कृष्णा मोरे (विधानसभा सचिव), अमोल मेघडमबर (संघटक), विनोद सूर्यवंशी (शाखाध्यक्ष), अज्जू शेख, संतोष बनसोडे, राजू गायकवाड, भगवान सोनवणे, अर्जुन कांबळे तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## धार्मिक स्थळांवरील एकतर्फी कारवायांवरून पुणे मनपाच्या महासभेत विशेष चर्चेसाठी मुस्लिम नगरसेवकांचे महापौरांना पत्र

### शहरातील धार्मिक स्थळांवर कारवाईचे धोरण जाहीर करेपर्यंत कारवाया रोखण्याची नगरसेवकांची आक्रमक भूमिका

**पुणे** : पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून शहरातील धार्मिक स्थळांवर केल्या जाणाऱ्या एकतर्फी कारवाया आणि प्रशासकीय मनमानीच्या मुद्यावरून होणाऱ्या मनपाच्या सर्वसाधारण सभेत (महासभेत) मोठे वादळ उठण्याची शक्यता आहे. या संवेदनशील विषयावर महासभेत तात्काळ विशेष चर्चा आयोजित करण्यात यावी आणि भूमिका मांडण्यासाठी वेळ दिला जावा, अशी अधिकृत मागणी करणारे पत्र नगरसेवक ॲड.गफूर पठाण यांच्यासह सात मुस्लिम नगरसेवकांनी मा.महापौरांना दिले आहे. असे पुणे महानगरपालिका सर्वपक्षीय मुस्लिम सभासद समिती यांच्याकडून दि.३०/६/२०२६ रोजी प्रसिध्दीपत्र देण्यात आले आहे. यामध्ये पुणे महानगरपालिकेतील नगरसेवक ॲड.गफूर पठाण, रफिक अब्दुल रहिम शेख, काशिफ सय्यद, आसिया गुजमिल शेख, तस्लीम हसम शेख, सायरा हनिफ शेख, नदाफ सुमेय्या महेबुब या आहेत. ते प्रसिध्दी पत्रकामध्ये म्हणतात की, गेल्या काही दिवसांपासून मनपा प्रशासनाकडून कायदेशीर चौकटीला बाजूला सारून विशिष्ट घटकांच्या धार्मिक स्थळांना लक्ष्य करून एकतर्फी कारवाया केल्या जात असल्याचा आरोप या लोकप्रतिनिधींनी केला आहे. पुणे शहराची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक




परंपरा शांतताप्रिय आहे. मात्र, प्रशासनाच्या अशा घाईघाईने आणि एकतर्फी घेतलेल्या निर्णयामुळे शहराचा सामाजिक सलोखा धोक्यात आला असून, नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली आहे.

मा,सर्वोच्च न्यायालयाच्या २०११ मधील ऐतिहासिक निकालानुसार आणि राज्य सरकारच्या २०१५ च्या शासन निर्णयानुसार जुनी धार्मिक स्थळे निष्कासित न करता नियमित करण्याचे स्पष्ट आदेश आहेत. तरीही न्यायालयीन आदेशांचे उघड उल्लंघन करून मनपा प्रशासन मनमानी कारभार करत असल्याचे नगरसेवकांनी पत्रात नमूद केले आहे. नगरसेवकांच्या प्रमुख मागण्या आणि भूमिका

१) महासभेत विशेष चर्चा व्हावी धार्मिक स्थळांवरील कारवाया हा थेट लोकभावनेशी आणि शहराच्या शांततेशी निगडित विषय असल्याने, उद्याच्या महासभेत सर्व कामकाज बाजूला ठेवून यावर विशेष चर्चा आयोजित करावी.

२) प्रशासनाने एसओपी स्पष्ट करावी धार्मिक स्थळांवर कोणतीही कारवाई करण्यापूर्वी महानगरपालिकेचे धोरण निश्चित नियमावली म्हणजेच एसओपी काय आहे ती सभागृहात स्पष्ट करावी.

३) एकतर्फी कारवाया तात्काळ थांबवाव्यात जोपर्यंत सर्व धार्मिक स्थळांचे अधिकृत सर्वेक्षण करून त्यांची कायदेशीर सद्यस्थिती तपासली जात नाही, तोपर्यंत सुरू असलेल्या सर्व एकतर्फी कारवाया थांबवण्यात याव्यात.

लोकशाही आणि संविधानाने लोकप्रतिनिधींना जनतेचे प्रश्न सभागृहात मांडण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे मुख्य सभेत महापौर या विषयाला प्राधान्य देऊन विशेष चर्चेसाठी वेळ देतील, अशी अपेक्षा नगरसेवकांनी व्यक्त केली आहे. जर प्रशासनाने किंवा सत्ताधाऱ्यांनी या संवेदनशील मुद्यावर चर्चा टाळण्याचा प्रयत्न केला तर सभागृहात तीव्र निषेध नोंदवला जाईल. असा इशाराही लोकप्रतिनिधींच्या वतीने देण्यात आला आहे.